I J R S S I S, Vol. VII, Issue (1), January 2019 : 01- 06 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES

© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)

www.vmsindia.org

# महिला उद्योजक, आव्हाने आणि संधी, एक अध्ययन

**प्रा. डॉ. अंजली रामराव हुमने**

सहयोगी प्राध्यापिका, गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख, यशवंत महाविद्यालय, सेलू, जि. वर्धा.

**सारांश :–**

सबल महिला बलवान भारत. असे महिला बॅकेचे ब्रीद वाक्य आहे. प्रत्येक महिलेने आर्थिकदृष्टया सक्षम होणे ही काळाची गरज आहे. मुलगी शिकली आणि प्रगती झाली असे म्हणतात, झपाटयाने आपल्या समाजातील महिलांची प्रतिमा बदलू लागली आहे. आधुनिक काळात बेरोजगारीचे प्रमाण अतिशयच वाढलेले आहे. त्यामुळे महिलांनी उदयोग व्यवसाय करणे आवश्यक झाले आहे. महिलांनीही वेगवेगळया क्षेत्रानुसार शिक्षण घेतलेले आहे परंतु सर्वानाच नोकरी मिळणे कठिण झाले आहे. बेरोजगारांची सतत वाढती संख्या, शासनाचे बदलत असलेले नियम, स्पर्धात्मक वातावरण, आर्थिक परिस्थिती इ. घटक या करिता कारणीभूत आहेत. त्यामुळे महिलांच्या शिक्षणाचा उपयोग व्हावा. कुंटूबाला आर्थिक मदत व्हावी. याकरिता महिलांनी घरबसल्या छोटे मोठे उद्योग सुरू करणे अंत्यत आवश्यक आहे. त्यामुळे महिलांनी उद्योग केल्यास भारताचा विकास होण्यास मदत होईल. महिलाकडिल उद्योगकांचा विचार केल्यास घर व समाज यांच्या विकासाला पोषक वातावरण देण्याकडे त्याचा कल जास्त असतो. उद्योग करणाऱ्या महिला आर्थिकदृष्टया सक्षम होतात हेही तेवढेच महत्वाचे आहे. महिलांनी उद्योग सुरू करायचे म्हटल्यास अनेक समस्या त्यांच्या समोर उभ्या राहतात. हयाच अडचणी समस्या महिलांना समोरील उद्योगासंदर्भातील आव्हाने ठरतात. परंतू महिलामध्ये एवढी शक्ती आहे की त्या कोणतेही आव्हान समर्थपणे पेलू शकतात. फक्त त्यांनी उपलब्ध संधीचा गरजेनुसार उपयोग करणे त्यासाठी श्रम घेणे, वेळेचे नियोजन व योग्य निर्णय, प्रसंगाची स्थिती ओळखणे अंमलबजावनी करणे इ. त्याकरीता महिलांनी स्वत:तील उर्जा किंवा शक्ती ओळखण्याची गरज आहे. महाराष्ट्रात फक्त १४टक्के महिला उद्योग करतात, त्यामुळे संदर्भातील उद्योग करणे अत्यंत आवश्यक आहे.

Keyword – **महिला, उद्योग, पोशाख**

**प्रस्तावना :–**

प्रत्येक महिलेने आर्थिकदृष्टया सक्षम होणे ही डिजीटल युगांतील गरज आहे. महिलांची प्रतिमा झपाटयाने बदलू लागली आहे. आपल्या कर्तुत्वाचा झेंडा महिलेने सातासमुद्रापार रोवला आहे. महिलेने स्वतंत्र उद्योगातही स्वत:ला उभ केलेलं आहे. परंतु स्त्रियांचे उद्योगातील अस्तित्व इतर देशाच्या तुलनेत नगण्य आहे. त्यामुळे आपल्या देशात महिला उद्योगाला जास्त वाव आहे. जास्तीत जास्त महिलांनी उद्योगाकडे वळणे ही काळाची गरज आहे. व्यवसायिकभिमुख शिक्षणामुळे तसेच गृहअर्थशास्त्र विषयाच्या शिक्षणामुळे महिला स्वतंत्र उद्योग करित असल्याचें दिसून येते. स्त्रियांना कुंटुबाची जबाबदारी सांभाळत असतांना उद्योग करणे आव्हानात्मक असते अशावेळी तिला तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे स्त्रियांनी छोटया गृहउद्योगापासून सुरवात केल्यास उद्योग करण्यास सोपे जाते. पारंपारीक उद्योगामध्ये मेणबत्या बनविणे, पापड, लोणचे, मसाले तयार करणे, सरबते तयार करणे, जेवणाचे डबे बनविणे, अगरबत्ती तयार करणे इत्यादी उद्योगाचा समावेश होतो. त्यामुळे आजच्या डिजीटलच्या काळात विविध प्रकारचे नवनवीन उद्योग करणे सोपे झाले आहे. असंख्य स्त्रियांनी मिळत असलेली नोकरी न करता नावीण्यपूर्ण उद्योक करण्यामध्ये उंच भरारी घेतलेली आहे. उदा. सहल उद्योग इलेक्ट्रानिक वस्तु बनविणे, प्लास्टीक वस्तुचे उत्पादन करणे, हळद बनविणे, सॅनीटरी नॅपकीनस तयार करणे, कापडी बॅग बनविणे इत्यादी. स्त्रिया आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून सरकारी योजनांचा ही फायदा काही स्त्रिया घेत आहेत. परंतु आजच्या स्पर्धेच्या युगात उद्योग करित असतांना स्त्रियांना अडचणी येतात त्यामुळे त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण होतात, त्यामुळेच अनेक आव्हाने उभी राहतात.

महिलासमोर उद्योगकरित असतांना त्याच्यासमोर खालील समस्या निर्माण होत असलेल्या दिसून येतात.

१. **मर्यादीत गतिक्षमता** :– महिला म्हणून पुरूषांच्या तुलनेत आपली उर्जा किंवा शक्ती कमी पडेल का ? असे स्त्रियांना वाटते.

२. **शिक्षणाचा अभाव** :– एखादा उद्योग करायचे ठरविण्यानंतर त्यासंदर्भात आपल्याला ज्ञान नाही, तत्सनंसी शिक्षण घेतलेले नाही, त्यामुळे उद्योग करणे जमेल का ? अशी भिती महिलाना असते.

३. **आत्मविश्वासाचा अभाव** :– उद्योगासंबंधी ज्ञानाचा अभाव, प्रेरणेचा अभाव यामुळे त्याच्यात आत्मविश्वासाचा अभाव दिसतो.

४. **कौटूंबिक बंधने** :– कुटुंबात पुरूष कमवितो, घर सांभाळणे स्त्रीचे काम आहे. उद्योग करणे स्त्रीचे काम नाही. इत्यादी बंधणे स्त्रियांवर असतात.

५. **पुरूष प्रधान संस्कृती** :– कुंटूबात पुरूषाप्रधान संस्कृती असते. म्हणून महिलांना उद्योग करू दिल्या जात नाही.

६. **पारंपारिक रीतीरिवाज**:– उद्योग करणे पुरूषांचे काम ही परंपरा समजली जाते.

७. **आर्थिक परिस्थिती**:– आर्थिक परिस्थिती चांगली नसेल तर उद्योगाकरीता भांडवल कोठून आणवे ही समस्या महिलासमोर असते.

८. **उपलब्ध भांडवल** :– उपलब्ध भांडवल कुठून मिळवावे हयाचे ज्ञान सर्वच महिलांना नसते.

९. **स्पर्धात्मक वातावरण** :– आधुनिक काळात स्पर्धेच्या युगात आपण उद्योग करू शकू की नाही ही भीती ? व्यवसायात तोटा होईल का ? ही शंका.

१०. **प्रेरणा व मार्गदर्शनाचा अभाव** :– प्रत्येक महिलेला प्रेरणा व मार्गदर्शन उद्योग करण्याकरिता मिळेलच याची श्वास्वती नसते.

११. उद्योगासंदर्भात प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाची माहिती सर्वच स्त्रीयांना नसते.

१२. **उद्योगाबाबत उदासीनता**:– उद्योग करणे, आपली ऐपत नाही ते जास्त उत्पन्न असणाऱ्याचे काम आहे. अशी महिलांमध्ये उद्योगाबाबत उदासीनता असते.

१३. **कष्ट करण्याची तयारी नसते** :– काही महिला आळसी वृत्तीच्या असतात. घरात पुरुष कमावतो ना ! मग आपल्याला काही उद्योग करायची गरज नाही, इत्यादी समस्या, महिला उद्योजकांसमोर आव्हान असतात.

महिला उद्योजकांमध्ये उद्दिष्य पुर्ती ठामपणा नेतृत्वगुण परस्परांवलंबीतत्व अंदाज बांधणे इत्यादी गुण असणे आवश्यक आहे. शाश्वत व आर्थिक सामाजिक विकासामध्ये महिला उद्योजकांची महत्वाची भुमिका आहे.

मात्र महिला उद्योजकांना उद्योग व्यवसाय उभारणी करतांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यात तांत्रिक व व्यावसायीक ज्ञानाचा अभाव गुणतणूक साहाय्य सुरक्षित परवडण्यायोग्य जागांचा अभाव इत्यादी. राज्याचा सर्व समावेश विकास करतांना महिला संचलीत उपक्रमाच्या माध्यमातुन आर्थिक व सामाजिक बदल घडण्यिासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे असल्यामुळे, राज्यात जागतिक पातळीवर एक प्रगत औद्योगिक केद्र बनविण्यास महिला उद्योगाच्या दृष्टीने मैत्रीपुर्ण व पुरक पोषक वातावरण तयार करण्यासाठी, विशेष प्रोत्साहन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यादृष्टीने महिलांना प्रोत्साहन देण्याकरीता उद्योगाच्या संधी उपलब्ध आहे. उदा. विविध उपक्रम, विविध देशातील प्रदर्शनीत सहभागी होण्याची संधी माहिती तंत्रज्ञान पुरस्कारांच्या धर्तीवर व्यवसायातील सर्वोत्मत्तेसाठी महिला उद्योजकाना पुरस्कांर देण्यात येतात. महिला व बालकल्याण विभागा कडुन विशेष साहय निधी देण्यात येतो. महिला उद्योजकाला व्यवसाय सुरू झाल्यावर उद्योगासबंधी प्रोत्साहन देण्याची सुविधा आहे. त्यामुळे महिलांनी नोकरीसाठी सरकारच्या अपेक्षावर राहण्यापेक्षा स्वत: रोजगार निर्माण करावा. उपलब्ध संधीचा जास्त उपयोग करून घ्यावा.

प्रस्तूत विषयाचे अध्ययन करित असतांना खालील बाबीचा अर्थ समजुन घेणे आवश्यक आहे.

**व्याख्या :–**

**उद्योजक :–** जो संघटन करतो, जो संचलन करतो आणि व्यवसायातील जोखीम स्विकारतो तो उद्योजक होय.

**महिलांची उद्योजक :–**

म्हणजे महिलांच्या उद्योगाचा कारभार एक किंवा अनेक महिलांकडून साभांळता येतो. हिला उद्योग करीत असेल तर त्यास महिला उद्योजक संबोधले जाते.

**आव्हाने :–** उद्योग करित असतांना अनेक समस्या व अडचणी येतात. त्या अडचणी किंवा समस्या सोडविणेम्हणजे आव्हान समर्थपणे पेलणे किंवा आव्हान स्विकारण्याची क्षमता किंवा उर्जा होय.

**संधी :–** उपलब्ध साधनांचा सोयींचा, गरजेनुसार योग्य उपयोग करून घेणे होय.

**संशोधनाची समस्या :–**

इतर देशाच्यातुलनेत भारतातील स्त्रियांचे उद्योग करण्याचे प्रमाण महाराष्ट्रात फक्त १४ टक्के आहे.हि खरी समस्या आहे.

प्रस्तुत विषयाची उकल करून उदिष्टये व गृहीतके निश्चित केली.

**संशोधनाची उदिष्टये :–**

- उद्योगातुन मिळणारा पैसा (नफा) हयांची कुटुंबाला आर्थिक मदत होणे.
- महिलांचे संघटन करणे.
- महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणे.
- महिलांना उद्योगासंदर्भात येणाऱ्या समस्यावर उपाययोजना सुचविणे.
- महिलांचा सर्वागिण विकास करणे.

**गृहतके :–**

- महिलांना उद्योग करण्याकरिता पाहिजे त्या प्रमाणात प्रोत्साहन मिळत नाही.
- महिलांना उद्योगासंदर्भातील सरकारी योजनाची माहिती आहे.

**संशोधन क्षेत्राची निवड :–**

प्रस्तुत विषयाचे अध्ययन करण्याकरीता वर्धाशहराची निवड केली. वर्धा शहरातच माझे वास्तव्य असल्यामुळे महिला उद्योजकांची माहिती व्हावी हया करीता वर्धा शहराची अध्ययन क्षेत्र म्हणून निवड केली.

**संशोधनाची आवश्यकता :–**

महिला उद्योजकाचे प्रमाण महाराष्ट्रात फक्त १४ टक्के आहे. त्या प्रमाणात वाढ होण्याकरिता वर्धा शहरातील महिलांना उद्योगाविषयी माहिती होणे आवश्यक आहे. त्यांच्या कुटूंबाला आर्थिक मदत व्हावी, त्यामुळे वर्धा शहरातील महिला उद्योजक हया विषयावर अध्ययन करावे असे मला वाटले.

**संधोधन पद्धती :–**

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनकरिता प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. संबंधीत विषयाची प्रश्नावली तयार करून वर्धा शहरातील, साडी आणि ड्रेस मटेरियल विक्री हा उद्योग करणाऱ्या २० महिला उद्योजकांकडून प्रश्नावल्या भरून घेण्यात आली.

प्रस्तुत अध्ययनात निश्चित केलेली संशोधनाची उद्दिष्टये व गृहीतके विचारत घेवून खालील (परिकल्पनांची) गृहीतकांची खालील प्रमाणे मांडणी केली.

१) महिलांना पाहिजे त्या प्रमाणात उद्योग करण्याकरिता प्रोत्साहन मिळत नाही.

२) महिलांना उद्योगासंदर्भात सरकारी योजनांची माहिती नाही.

**निष्कर्ष :–**

प्रस्तुत विषयाचे अध्ययन केल्यानंतर खालिल निष्कर्ष निघालेत.

1. ७५ टक्के महिलांना कुटूंबात आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने उद्योग करावा असे वाटले. २५ टक्के महिलांना इतर कारणांमुळे उद्योग करावा ही कल्पना सुचली.
2. ५० टक्के महिलांना आर्थिक परिस्थीतीमुळे उद्योग करावा असे वाटले. ५०टक्के महिलांना घरबसल्या हा उद्योग होवू शकतो. त्यामुळे उद्योग करण्यास सुरूवात केली.
3. ७५ टक्के महिलांना कुटूंबातुन उद्योगाकरिता भांडवल मिळाले. २५ टक्के महिलांना बचतगटाकडून मदत झाली.
4. ५० टक्के महिलांना उद्योगासंदर्भात अनुभव होता तर ५० टक्के महिलांना उद्योगासंदर्भात अनुभव नव्हता असे आढळले.
5. ५० टक्के महिलांना उद्योगाकरिता पतीकडून मार्गदर्शन मिळाले, २५ टक्के महिलांना स्वत:च उद्योग करावा असे वाटले. २५ टक्के महिलांना ज्यांना उद्योगाचा अनुभव होता त्यांच्याकडुन मार्गदर्शन मिळाले.
6. महिलांना उद्योगासंदर्भात सरकारच्या योजनोची कुणालाच माहिती नाही.
7. १०० टक्के महिलांना घर सांभाळून उद्योग चांगल्या प्रकारे करू शकतो असे वाटते.
8. सर्वच महिला उद्योजकांना कुटूंबातील समस्याची उद्योगासंदर्भात मदत होते.
9. यामध्ये महिलांना बहिण, मैत्रीण, कुटूंबातील सदस्य, पती यांची मदत होते असे आढळले.
10. ५० टक्के महिलांना उद्योगाकरिता सर्वाकडूनच प्रेरणा मिळाली. २५ टक्के महिलांना मैत्रीणींकडून उद्योगाकरीता प्रेरणा मिळाली. २५ टक्के महिलांना उद्योगाकरीता प्रेरणा मिळाली नसल्याचे आढळले.
11. ७५ टक्के महिलांकडे उद्योगकरीत असताना घरीच ग्राहक येतात व मालाची विक्री होते. २५ टक्के महिलांकडे मालाच्या विक्रीकरीता घरोघरी जावे लागत असल्याचे आढळले.
12. १०० टक्के महिला उद्योगाकरीता मालाच्या विक्रीसंदर्भात जाहीरात करतात
13. संबंधीत व्यक्तीना माहिती देवून मालाच्या विक्रीसंदर्भात जाहिरात केली जाते.
14. १०० टक्के महिला करीता असलेल्या उद्योगासंदर्भात माहिती मिळवत असतात असे आढळले.
15. २५ टक्के महिला इंटरनेटच्या माध्यमातुन ७५ टक्के महिला दुकानातून, तर २५ टक्के महिला कुटुंबातील सदस्याकडून माहिती मिळवत असल्याचे आढळले.
16. ५० टक्के महिलांच्या मते उद्योगावर पारंपारिक रूढीचा परिणाम होतो असे आढळले.
17. १०० टक्के महिलांच्या मते, उद्योगाकरिता व्यावसायीक धोके वाटतात असे आढळले.
18. ५० टक्के महिलांच्या मते, आर्थिक परिस्थितीमुळे तर ५० टक्के महिलांच्या मते, काम करणारे मजुर ग्राहक उधारीत माल खरेदी करतात उधारी लवकर देत नसल्याचे आढळले.

19. १०० टक्के उद्योग व घर सांभाळणे हया दोन्हीकरिता वेळेचे नियोजन महिला करीत असल्याचे आढळले.

20. १०० टक्के महिला उद्योगाकडे काटेकोर लक्ष देत असल्याचे आढळले.

21. १०० टक्के महिलांना उद्योगातील स्पर्धात्मक वातावरणाचा आपल्या उद्योगावर होईल असे वाटते.

22. उद्योगावर स्पर्धात्मक वातावरणाचा परिणाम होत असल्याचे महिला उद्योजकांना वाटत असल्यामुळे त्यातील २५ टक्के महिला नावीण्यपूर्ण मालाची विक्री कशी करता येईल यासाठी प्रयन्न करतात. तर २५ टक्के महिलांना आवडीनिवडी बदलत असल्यामुळे ऑनलॉईन शॉपीगमुळे उत्पादनात जास्तीत जास्त वाढ होत असल्यामुळे उद्योगात व्यावसायीक धोके निर्माण होईल ही भीती वाटत असल्याचे आढळले.

23. उद्योगात व्यवसायीक धोका निर्माण होवू नये या करिता वेगवेगळया क्वॉलिटीचा माल ठेवून ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात असे आढळले. २५ टक्के महिलांनी लोकांना व्यवसायाची माहिती देतो असे मत व्यक्त केले.

24. पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची उद्योग करण्याची गतिक्षमता कमी असल्याचे २५ टक्के महिलांना वाटते. तर ७५ टक्के महिलांना आपण उद्योग करण्याकरीता सक्षम आहोत असे वाटते.

25. ७५ टक्के महिलांना उद्योग करतांना शिक्षण व आत्मविश्वासाचा अभाव वाटतो असे आढळले.

26. २५ टक्के महिलांना उद्योगासंदर्भात प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाची माहिती आहे असे आढळले.

27. ५० टक्के महिला इतर स्त्रीयांना उद्योग करण्याकरिता प्रोत्साहीत करतात असे आढळले.

28. १०० टक्के महिला उद्योजकांच्या मते, महिलांनी विविध उद्योग करावे असे वाटते.

29. २५ टक्के महिला उद्योग करतांना मालाची ठोक खरेदी करतात. २५ टक्के महिला किरकोळ खरेदी करतात तर २५ टक्के महिला प्रसंगानुरूप २५टक्के महिला गरजेनुसार मालाची खरेदी करतात असे आढळले.

30. १०० टक्के महिला उद्योग करतांना क्रियाशील असतात असे आढळले.

31. ७५ टक्के उद्योगाकरिता वाहतूक साधने यांचा विचार करतात असे आढळले.

32. १०० टक्के महिला उद्योजकांच्या मते, व्यवसायात प्रगती करण्याकरीता उद्योगात सुस्पष्टता असावी असे मत व्यक्त केले.

33. १०० टक्के महिला उद्योजक व्यवसायाच्या प्रगतीचे मूल्यमापण करतात असे आढळले .त्यामुळे योग्य मालाची खरेदी करण्यास मदत होते व योग्य निर्णय घेण्यास मदत होते.

**सुचना :–**

1. महिला उद्योजकांनी काही गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज आहे.
2. स्वत: मध्ये आत्मविश्वास निर्माण करावा.
3. घर व व्यवसाय या दोन्ही मध्ये ताळमेळसाधतांना वेळेचे नियोजन करावे.
4. स्वत:च स्वत:ची प्रेरणा व्हावे. उत्तम उद्योजग व्हायचे असेल तर आपला दृष्टीकोण सकारात्मक ठेवण्याचा प्रयत्न करावा.
5. स्वत: स्वत: ला प्रोत्साहन दयावे.
6. व्यवसायातील मार्केटिंग, व्यवसायातील धोके अडचणी, महिला उद्योजकांनी व्यवस्थित समजून घ्याव्यात.
7. उद्योगाकरिता आर्थिक साहाय्य करणाऱ्या संस्था, उद्योगासंदर्भात आवश्यक कागद पत्रे यांचा ही विचार करावा.
8. व्यवसायाच्या व्यवस्थापनाकडे काटेकोर लक्ष दयावे.
9. महिला उद्योजकांनी व्यवसाय प्रशिक्षणाच्या कोर्सेसचा उद्योगाकरीता उपयोग करून घ्यावा. त्यामुळे आशावादी प्रयत्नवादी, दिशादर्शक व यशस्वी वाटचाली साठी प्रेरणादायक मानसिकतेची त्यांना भेट मिळते.
10. आपल्या देशातील महिला उद्योजकांच्या संख्येत वाढ होण्याकरिता महिलांनी उद्योग करण्याकडे वळावे. प्रत्येक स्त्रीने स्वत:तील उर्जा ओळखुन उद्योगाची निवड करावी. त्यामुळे महिलांचा विकास होईल आणि देशाचाही विकास होईल यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ :–**

(1) http://udyojak.org> needs of woman....
(2) http://udyojak.org> Maharashtra woman....
(3) http:// maharashtratimes.indidtime.com
(4) shodganga.inflibnet.ac in > bitstream
(5) woman self help group take the initiative to establish the industry.
(6) डॉ. इंदिरा खडसे – गृहव्यवस्थापन आणि गृहकला

❖❖❖❖